



संत जगनाडे महाराज शिक्षण मंडळाचे

# कला, वाणिज्य वरिष्ठ व कला, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय

## खापर ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार




## * माहिती पत्रक *

सन - 2019- 2020

किंमत - ३०/- रूपये



कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक वृंद



राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी/विद्यार्थीनी ''वृक्षारोपन'' करतांना



महाविद्यालयाचा प्रागंणात वृक्षारोपन करतांना नॅक समिती सह
चेअरमन मा.बापूसो.व्ही.सी.चौधरी, मा.प्राचार्य ए.एस.भोळे व शिक्षक वृंद




महाविद्यालयीन विद्यार्थी प्रतिनिधी (CR) वसावे प्रकाश सह शिक्षक, विद्यार्थी व विद्यार्थीनी

संत जगनाडे महाराज शिक्षण मंडळाचे

# कला, वाणिज्य वरिष्ठ व कला, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय

## खापर ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार



# * माहिती पत्रक *

## सन - 2019- 2020

| | |
|---|---|
| मंडळाची स्थापना | - १९९० |
| महाविद्यालय स्थापना | - १९९६ |

**विद्यार्थ्यांनी सदर माहिती पत्रक वर्षभर जपून ठेवावे.**

Principal
S. J. M. S. M.
Arts & Com. Senior College
Khapar Tal. Akkalkuwa
Dis. Nandurbar

# सुस्वागतम्

संत जगनाडे महाराज शिक्षण मंडळाच्या कला महाविद्यालयात प्रवेशित होणाऱ्या सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थीनींचे हार्दिक स्वागत !

दूरितांचे तिमिर जावो ! विश्व स्वधर्म सूर्य पाहो !! हे ब्रीद वाक्य सत्यात आणने म्हणजे अज्ञान अंधकाराला शिक्षणाच्या ज्योतीने प्रकाशित करणे, संत जगनाडे महाराज शिक्षण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मा.बापूसाहेब व्ही.सी.चौधरी यांनी या भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची व्यवस्था विद्यार्थ्यांच्याच परिसरात व्हावी म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्याचाच परिपाक म्हणजे खापर येथील कला महाविद्यालय होय.

कला महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासन आणि विद्यापीठ स्तरावरील सर्व उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देतांना स्पर्धा परिक्षाचे महत्व आणि रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी म्हणून अनुभवी, अभ्यासू व उच्च शिक्षित प्राध्यापक मार्गदर्शक करतात. त्याच बरोबर विविध कला गुणांना वाव देण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. अशा या महाविद्यालयाची सुसज्य इमारत असून विद्यार्थ्यांना पायाभूत सुविधा प्राप्त करून देतांना इंटरनेट, माहिती तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी संगणक, ग्रंथालय, विविध प्रकारचे क्रिडा साहित्य आणि पटांगणाची सुविधा उपलब्ध आहे. प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती, परिक्षा पद्धती यासाठी तत्परतेने व कार्यक्षमपणे कार्यप्रणव असलेला शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थ्यांना सर्व सुविधा प्राप्त करून देता येतात.

संत जगनाडे महाराज शिक्षण मंडळाच्या वरिष्ठ महाविद्यालयाची १९९६ पासून आज पर्यंतच्या वाटचालीत गुणवान, चारित्र्यवान आणि उत्वल कारकिर्द घडविणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आपला सहभाग उत्साह वाढविणारा आहे. आपण महाविद्यालयाच्या सर्वांगिण विकासातील एक घटक असल्यामुळे आपल्या प्रवेशास शुभेच्छा देवून अभिनंदन करतो.

डॉ. ए. एस. भोळे

प्राचार्य

# माहिती पत्रक सन २०१९- २०२०

महाराष्ट्रात शिक्षण प्रसार झपाट्याने होत आहे. त्यामुळे शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातही महाविद्यालये नव्याने स्थापन होत आहेत. विज्ञान, कला, वाणिज्य इ.क्षेत्रात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार व्यापक स्वरूपात व्हावा म्हणून महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर शिक्षण संस्था स्थापन विद्यालये महाविद्यालये निर्मितीला प्रोत्साहन दिले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या या धोरणात्मक निर्णयाचा अभ्यासुवृत्तीचे संस्थापक अध्यक्ष बापूसाहेब व्ही.सी.चौधरी, यांनी ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांची निकड लक्षात घेवून खापर येथे माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालय आणि महाविद्यालय सुरू केले. बऱ्हाणपुर-अंकलेश्वर महामार्गावर खापर हे गांव निसर्गमय परिसरात वसलेले आहे. उत्तर दिशेला वाहणाऱ्या तापी नदीचा प्रवाह, दक्षिण दिशेला सातपुडा पर्वत रांगाचा दऱ्या-खोऱ्याच्या आणि औषधी वनस्पतीसह असलेल्या जंगलमय प्रदेश, पश्चिमेला उकाई धरण आणि गुजरात राज्याची सिमा तर पुर्वेला नंदुरबार जिल्ह्याच्या विस्तर्ण प्रदेश असे भौगोलिक वातावरणात लाभलेला हा परिसर ऐतिहासिक दृष्ट्याही प्रसिद्ध आहे. या परिसरात अनेक संस्थाने होती. ही संस्थाने आदिवासी संस्थानिकांच्या नियंत्रणाखाली होती आजही या संस्थानांचे अवशेष ऐतिहासिक वारसाची साक्ष देतात. अशा या परिसरात उच्च शिक्षणाची संधी संत जगनाडे महाराज शिक्षण मंडळाने महाविद्यालयाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली आहे.

१९९६ मध्ये महाविद्यालयात प्रथम वर्षात वर्गात प्रवेश देवून उच्च शिक्षणाचा शुभारंभ केला नैसर्गिक विस्ताराने विस्तारत अनेक अडचणींवर मात करत महाविद्यालयाने प्रगतीत भर घातलेली आहे. विविध विषय अभ्यासक्रमात समाविष्ट केलेले आहेत. अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असलेल्या या महाविद्यालयाच्या माहिती पुस्तकात त्यांचा आवर्जून उल्लेख केलेला आहे.

**१) नवी इमारत** : महाविद्यालय स्थापने पासूनच महाविद्यालयासाठी सर्व सोयींनी परिपूर्ण इमारत बांधण्याचे मंडळाचे ठरविले. त्यानुसार खापर येथे, बऱ्हाणपुर-अंकलेश्वर रोडलगत प्रशस्त जागा घेतली. त्या जागेवर बांधकाम पुर्ण केले. नोव्हेंबर २००३ पासून महाविद्यालय मंडळाच्या इमारतीत सुरू आहे.

**२) खेळाचे मैदान** : महाविद्यालयात उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाने ठरविलेल्या खेळापैकी देशी व विदेशी खेळ खेळले जातात. तात्पुरती खेळांची व्यवस्था महाविद्यालयाच्या इमारतीच्या शेजारी उपलब्ध जागेत केली आहे.

कबड्डी, खो-खो, क्रिकेट, व्हॉलीबॉल, फुटबॉल, हॉकी इत्यादी व रनींग, सांघिक खेळ, मैदानी खेळ व ट्रॅकसाठी महाविद्यालयाच्या इमारतीच्या शेजारीच मंडळाचे दुसरे मैदान आहे. प्रशिक्षित क्रिडा संचालकाची महाविद्यालयात नेमणुक केली आहे.

३) **ग्रंथालय** : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन व महाविद्यालयीन विविध विषयांसाठी क्रमिक पुस्तके, संदर्भग्रंथ, मासिके व नियतकालिके उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याशिवाय विद्यार्थ्यांच्या मागण्यानुसार आणि वेळोवेळी महाविद्यालयाला भेटी देणाऱ्या स्थानिक चौकशी समितीच्या सूचनानुसार त्यात भर घातली जात आहे.बुक बँक रिडींगची व्यवस्था केलेली आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांस एक ग्रंथ घरी वाचण्यास दिले जाते.

४) **विविध मंडळे** : विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासक्रमशिवाय समाधानकारक, गुणविकास करण्यासाठी अंगभूत विविध कला गुण व वकृत्वाला प्रोत्साहन मिळावे म्हणून विविध मंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत.त्यात सांस्कृतिक मंडळ, वाड्.मय मंडळ व सामाजिक शास्त्र मंडळ स्थापन करण्यात आली आहेत.त्यात विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो.त्याशिवाय शैक्षणिक सहली आयोजित केल्या जातात.

**५) आर्थिक सवलती :**

अ) आर्थिकदृष्ट्या मागसवर्गीय विद्यार्थ्यांसाठी :

आर्थिक दृष्ट्या कमकुवत गटातील पालकांच्या पाल्यांना १५000/ – रू. खालील उत्पन्न गटाच्या इ.बी.सी.सवलती मिळतात.

ब) मागासवर्गीय शिष्यवृत्त्या :

मागासवर्गीय जाती–जमातीसाठी केंद्र सरकारची शिष्यवृत्ती आहे. त्यानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांची प्रवेश फी, शिक्षण फी, परिक्षा फी व इतर अनेक सवलती शासन नियमाप्रमाणे मिळतात.

क) अपंग शिष्यवृत्ती :

शारिरीक दृष्ट्या अपंग असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासन खास शिष्यवृत्ती देते.

ड) प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी फी सवलती :

प्राथमिक, माध्यमिक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी म्हणून काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना त्याचे संबंधित फार्म भरून आवश्यक ती कागदपत्रे जोडल्यास ही फी सवलत त्यांना प्राप्त होते.

इ) सैनिकांच्या पाल्यांसाठी फी सवलत :

स्वातंत्र्य सैनिक व भारतीय लष्करातील सैनिकांच्या पाल्यांनाही केंद्र व राज्य शासनाने शैक्षणिक व अन्य फी उपलब्ध करून दिली आहे. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना मिळेल.

ई) गुणवत्तेनुसार शिष्यवृत्त्या :

शासनाकडून गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्ता क्रमानुसार ओपन मेरीट स्कॉलरशीप सारख्या शिष्यवृत्त्या मिळतात.

ए) संस्थेतर्फे शिष्यवृत्ती :

संस्था गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना प्रवेश फी, शिक्षक फी इत्यादी मध्ये गरजेनुसार सवलती देते.

**६) शिक्षक वर्ग :** महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व शिक्षणशिवाय इतर गुणवत्ता वाढीसाठी विद्यापीठ नियमानुसार विहित प्रशिक्षित शिक्षक वर्गाची नेमणुक केली आहे.

**७) प्रवेशाची सूचना :** विद्यापिठाने घेतलेल्या निर्णयानुसार २०१   -१   यावर्षी पहिले शैक्षणिक सत्र जून २०१   पासून सुरु होत आहे. महाविद्यालय   जून पासूनच नियमित सुरु होत असून विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षात प्रवेश घेतांना विद्यापीठात पात्र होण्यासाठी व आर्थिक सवलतीसाठी संबंधित कागद-पत्राच्या मुळप्रति व झेरॉक्स प्रत, फोटो इत्यादी प्रवेशाच्या वेळी सादर कराव्यात.

*** प्रथम वर्ष प्रवेशासाठी पात्रता :**

१) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही उच्च माध्यमिक बोर्डाची १२ वी कला, विज्ञान, वाणिज्य परीक्षा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी प्रथम वर्ष कला वर्गाच्या प्रवेशासाठी पात्र आहे.

२) १७ नंबरचा १२ वी परीक्षा फॉर्म भरून बहिस्थ म्हणून उत्तीर्ण झालेला विद्यार्थी प्रवेशास पात्र आहे.

३) अ) १२ वी पास होऊन डी.एड.झालेला मात्र विद्यार्थी इंग्रजी विषयासह पास झालेला असल्यास प्रवेशासाठी पात्र आहे.

ब) १० वी पास होऊन डी.एड.झालेला मात्र शिक्षण प्रशिक्षण मंडळाचे इंग्रजीसह परीक्षा उत्तीर्ण झालेल्या अशा विद्यार्थ्याला मायग्रेशन सर्टिफीकेट सोबत जोडावे लागेल.

४) विद्यापीठाने प्रथम वर्षात प्रवेशासाठी नमुद केलेला अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात चौकशी करून त्या परीक्षा घेणाऱ्या मंडळाची नावे जाणून घ्यावीत.

५) प्रवेश अर्ज/ई-सुविधा फार्म भरतांना संपूर्ण माहिती भरणे बंधनकारक आहे.

## कनिष्ठ महाविद्यालयात शाखेनुसार शिकविले जाणारे विषय

**अ) अभ्यासक्रमातील विषय (कला शाखा)**

१) अनिवार्य विषय :   १) इंग्रजी   २) मराठी   ३) हिंदी
४) पर्यावरण शिक्षण   ५) आरोग्य व शारिरीक शिक्षण

२) ऐच्छिक विषय :   १)--------   २) -----------   ३)-----------
(अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, शिक्षणशास्त्र, भुगोल, इतिहास यापैकी कोणतेही तीन विषय घेता येतील.)

**ब) अभ्यासक्रमातील विषय (विज्ञान शाखा)**

१) अनिवार्य विषय :   १) इंग्रजी   २) भौतिकशास्त्र   ३) जीवशास्त्र
४) रसायनशास्त्र   ५) पर्यावरण शिक्षण   ६) आरोग्य व शारिरीक शिक्षण

२) ऐच्छिक विषय :   १)------------------- (भुगोल किंवा गणित पैकी एक)   २) ---------------- (हिंदी किंवा मराठी पैकी एक)

## * कला विभाग *

एफ.वाय.बी.ए.च्या विद्यार्थ्यांना खालील गटातून (गृप) सहा विषयांची निवड करावयाची आहे.

| Group | किती विषय घ्यावयाचे ? How many subjects to choose | Subjects |
|---|---|---|
| A | One एक | Compulsary English अनिवार्य इंग्रजी |
| B | Minimum One कमीत कमी एक | Marathi मराठी / Hindi हिंदी |
| C to G | Maximum Four जास्तीत जास्त चार | History इतिहास / Economic अर्थशास्त्र<br>Geography भुगोल<br>Politics राज्यशास्त्र<br>Defence Studies संरक्षणशास्त्र |

*** विशेष सूचना :**

१) प्रथम वर्ष कला या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील गटातून सहा विषयांची निवड करावयाची आहे.

२) गट ''A'' अनिवार्य आहे

३) गट ''B'' मधून कमीत कमी एक विषय घ्यावा लागेल.

४) इतर गटातून चार विषय घेता येतील.

५) ज्या विषयांची शिकविण्याची सोय महाविद्यालयात आहे.तेच विषय विद्यार्थ्यांना घेता येतील.

६) प्रथम वर्ष कलाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ नियमानुसार वैद्यकिय तपासणी करून घेणे आवश्यक आहे.तसे न केल्यास विद्यापीठ निकाल राखून ठेवील. पर्यावरणशास्त्र १०० गुणांचा पेपर सक्तिचा आहे. त्यात ७५ गुण थेअरीसाठी व २५ गुणांचे प्रात्यक्षिक परीक्षा राहील.

७) पर्यावरण शास्त्र (Environmental Science)

हा विषय F.Y.B.A. या वर्गाला सक्तिचा आहे. यासाठी स्वतंत्र १०० रू.फी आहे. F.Y.B.A. च्या परिक्षेच्या वेळी या विषयाची परीक्षा घेण्यात येईल. या विषयासाठी तज्ञ प्राध्यापक स्वतंत्र वेळेत मार्गदर्शन करतील. तरी सर्व विद्यार्थ्यांनी मार्गदर्शनाचे वेळी उपस्थित राहावे. विद्यापीठाच्या नियमानुसार या विषयात पास झाल्याशिवास पदवी मिळणार नाही.

महाविद्यालयात पुढील प्रमाणे स्पेशल व जनरल पेपर द्वितीय व तृतीय वर्ष कलासाठी विशकविले जातात.

स्पेशल : मराठी, इतिहास, भूगोल, हिंदी

जनरल : इंग्रजी, मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, भूगोल, सरंक्षणशास्त्र, पर्यावरणशास्त्र

## * द्वितीय वर्ष कला *

प्रथम वर्ष कला वर्गातील सर्व विषय किंवा किमान चार दिवस उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्ष कला वर्गात प्रवेश मिळेल. द्वितीय वर्षा करिता विशेष विषय निवडण्यासाठी प्रथम वर्ष कलासाठी विद्यार्थ्यांने तो विषय घेतला असला पाहिजे.

पदवी परीक्षेसाठी द्वितीय वर्ष ६ व तृतीय वर्ष ६ असे १२ पेपर्स विद्यार्थ्यांनी घ्यावयाचे असतात. (दोन्ही म्हणजे द्वितीय आणि तृतीय वर्षासाठी प्रत्येकी एक पेपर सक्तीचा इंग्रजी असेल.) द्वितीय वर्षासाठी पुढीलप्रमाणे अभ्यासक्रम विद्यार्थ्याला अभ्यासवयाचा आहे.

१) अनिवार्य इंग्रजी (Comp. English)

२) विशेष पेपर (एस-१)

३) विशेष पेपर (एस-२)

४) जनरल पेपर (जी-२)

५) स्पेशल विषयाखेरीज दोन जनरल पेपर (जी-२)

*** सामान्यज्ञान :**

द्वितीय वर्गासाठी सामान्यज्ञान (जनरल नॉलेज) हा विषय अतिरिक्त (सक्तीचा) सुरू करण्यात आला आहे.त्याची परिक्षा द्वितीय वर्षाच्या परीक्षेबरोबर होईल. यासाठी फी ५०/- रूपये राहील.प्रत्येक विषयासंबंधी तज्ञ प्राध्यापक स्वतंत्र वेळेत मार्गदर्शन करतील तरी त्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. विद्यापीठाच्या नियमानुसार या विषयात पास झाल्या शिवाय पदवी मिळणार नाही.

द्वितीय वर्ष कला भुगोल एस-२ च्या पेपरला १०० गुण प्रात्यक्षिक परीक्षा आहे.

## * तृतीय वर्ष कला *

प्रथम वर्ष उत्तीर्ण व द्वितीय वर्ष कला दोन विषयांची ए.टी.के.टी.मिळालेला विद्यार्थी तृतीय वर्ष कला वर्गाच्या प्रवेशास पात्र आहे.

१) अनिवार्य इंग्रजी (Comp. English)

२) विशेष पेपर (एस-३)

३) विशेष पेपर (एस-४)

४) जनरल पेपर (जी-३) (घेतलेला स्पेशल विषय)

५) स्पेशल विषयाखेरीज दोन जनरल पेपर (जी-३)

एस. जे. एम. एस. एम. चे

# कला व वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालय

खापर ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार

## * फी संबंधीचा तक्ता *

| तपशील | प्रथम वर्ष कला | द्वितीय वर्ष कला | तृतीय वर्ष कला |
|---|---|---|---|
| प्रवेश शुल्क | २५ | २५ | २५ |
| ग्रंथालय शुल्क | १२५ | १२५ | १२५ |
| जिमखाना शुल्क | १०० | १०० | १०० |
| पात्रका शुल्क | ५० | -- | -- |
| अंतर्गत परिक्षा शुल्क | ६० | ६० | ६० |
| विद्यार्थी उपक्रम शुल्क | ४० | ४० | ४० |
| वैद्यकिय शुल्क | २५ | -- | -- |
| आपात्कालीन व्यवस्थापक शुल्क | १० | १० | १० |
| वार्षिक नियतकालिका शुल्क | ४० | ४० | ४० |
| महाविद्यालय विकास निधी | ७५ | ७५ | ७५ |
| गरीब विद्यार्थी सहायता निधी | ४० | ४० | ४० |
| अश्वमेध शुल्क | ३० | ३० | ३० |
| विद्यापीठ संगणक शुल्क | २० | २० | २० |
| विद्यार्थी समुह विना फी | १० | १० | १० |
| ई-सुविधा फी | ५० | ५० | ५० |
| स्नेहसंमेलन शुल्क | ४० | ४० | ४० |
| माजी विद्यार्थी संघ शुल्क | २५ | २५ | २५ |
| पर्यावरण शुल्क | १२५ | -- | -- |
| ग्रंथालय अनामत | १०० | -- | -- |
| किरकोळ शुल्क | १०० | १०० | १०० |
| शिक्षण शुल्क | ८०० | ८०० | ८०० |
| विशेष भूगोल विषयाकरिता प्रयोग शाळा फी | -- | २५० | २५० |
| एकुण | १८९० | १८४० | १८४० |

## * डिपॉझिट / अनामत *

महाविद्यालयात प्रवेश घेते वेळी विद्यार्थ्यांनै जे डिपॉझिट भरले असेल ते त्यास महाविद्यालय सोडून गेल्यानंतर येणाऱ्या सप्टेंबर महिन्यात परत केले जाईल.

अनामत रक्कम मिळण्यासाठी करावयाचा अर्जासोबत (ओळखपत्र) व लायब्ररी कार्ड ग्रंथालयात परत करणे आवश्यक आहे.त्या शिवाय अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

विद्यापीठाच्या कोणत्याही परीक्षेस बसतांना विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे परीक्षा फी चलन / पावती विद्यार्थ्यांनी सांभाळली पाहिजे.परीक्षा फॉर्मवर विषय स्वतः लिहावे एकदा घेतलेले विषय बदलता येणार नाही.परीक्षा फॉर्ममध्ये भरलेल्या माहितीस संबंधित विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील.

## * परिशिष्ट- १ *

१) महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी येणारा प्रत्येक विद्यार्थी हा चांगल्या वर्तनाचा आहे. असे गृहित धरले जाते.यासाठी पुर्वीच्या प्रमुखांचे मत विचारात घेतले जाते.आवश्यक्ता वाटल्यास एखाद्या विद्यार्थ्यांबद्दल असे मत मागविले जाते.हे मत प्रतिकुल असणाऱ्या विद्यार्थ्याला प्रवेश दिला जात नाही.अथवा त्याला दिलेला प्रवेश रद्द होतो.

२) वाईट वर्तनाबद्दल पुर्वी शिक्षा (तात्पुरत्या पोलीस कस्टडीसह) झालेला दंगाधोका, मारहान यातील संशयित किंवा पोलिसाकडून समाजकंटक ठरविला गेलेला विद्यार्थी प्रवेशास अपात्र राहील.

३) एखाद्या विद्यार्थ्याकडून महाविद्यालयाची (एन.एस.एस.सह) मालमत्ता, ग्रंथ, स्टेशनरी क्रिडा–साहित्य, रोकड अनामत रक्कम इत्यादी गोष्टीस हानी पोहोचली असेल किंवा त्यासंबंधीचा त्यांच्याकडील हिशोब आलेला नसेल तर अशा विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाणार नाही.

४) प्राध्यापकांचे आदेश न पाळणे, त्यांचा अपमान करणे, विद्यार्थ्यात फुट पाडणे, संप मारामारी यात भाग घेणे, बाहेरील लोकांना आणून महाविद्यालयात अशांतता निर्माण करणे यासारख्या कृतीशी एखाद्या विद्यार्थ्यांचा संबंध असल्याचे आढळून आल्यास त्या विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाणार नाही.दिलेला प्रवेश रद्द करण्यात येईल.

५) प्राचार्यांच्या मते एखाद्या विद्यार्थ्यांचे वर्तन गैर आढळल्यास त्याला प्रवेश दिला जाणार नाही अगर दिलेला प्रवेश रद्द करण्यात येईल.

६) प्रवेशाबाबतचे दिलेले सर्वाधिकार प्राचार्यांचे आहेत व त्यंचा निर्णय या बाबत अंतिम असेल.

अ) शैक्षणिक शुल्क विद्यार्थ्यांना परत करण्याबाबतचे नियम :

१) शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत प्रवेश रद्द करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क परत मागण्याबाबत अर्ज महाविद्यालयाच्या/मान्यताप्राप्त संस्था/विद्यापीठाकडे आल्यास शैक्षणिक शुल्कापैकी १०% रक्कम कापण्यात येऊन उरलेले सर्व शैक्षणिक शुल्क परत करण्यात येईल आणि प्रवेश शुल्काव्यतिरिक्त इतर सर्व शैक्षणिक शुल्क परत करण्यात येईल.

२) शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत प्रवेश रद्द करू इच्छिणाऱ्या विद्यापीठाचे शिक्षण शुल्क परत मागणीबाबत अर्ज महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्था/विद्यापीठाकडे असल्यास शैक्षणिक शुल्का पैकी २५% रक्कम कापण्यास येऊन फक्त शैक्षणिक शुल्क परत करण्यात येईल इतर शुल्क परत करण्यात येणार नाही.

३) शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापासून १५ दिवसानंतर विद्यार्थ्यांचा शैक्षणिक शुल्क परत मागणीबाबत अर्ज आल्यास कोणत्याही परिस्थितीत शैक्षणिक शुल्क आणि इतर शुल्क परत करण्यात येणार नाही.

*** शुल्कासंबंधी नियम :**

१) महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने तक्त्यात दिल्याप्रमाणे शुल्क भरावे.

२) एकदा भरलेले शुल्क परत मिळणार नाही.

३) सत्रांचे कामकाज सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्याने आपला प्रवेश रद्द केला तरी त्यास त्या सत्राचे संपूर्ण शुल्क भरावे लागेल.हे शुल्क भरल्याशिवाय महाविद्यालय सोडण्याचा दाखला देण्यात येणार नाही.

४) शासन अगर विद्यापीठ यांच्या आदेशानुसार शुल्क दरात बदल होऊ शकेल तो वेळोवेळी विद्यार्थ्यांना सुचना फलकावर कळविला जातो.

५) मुदतीच्या आत फी चा हप्ता न भरल्यास दंड आकारला जाईल.

*** कमवा व शिका योजना :**

१) आर्थिक दृष्ट्या दुर्बल, गरजु व होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे.

२) स्वालंबाने श्रमप्रतिष्ठा वाढविणे.

३) स्वयंरोजगारसाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे.

४) योजनेच्या माध्यमातुन महाविद्यालयांतील उपक्रममध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे.या योजनेखाली विद्यार्थ्यांना दिवसाला जास्तीत जास्त तीन तास काम द्यावे.कामाचे तास निश्चित करतांना त्यांच्या वर्ग अध्ययनाच्या वेळेव्यतिरीक्तची वेळ ग्राह्य धरावी.दर तासी मेहनताना रू.८/- प्रमाणे अदा व्हावा.

वर्षभरात शासन अथवा संत जगनाडे महाराज शिक्षण मंडळ, खापर यांनी उभारलेल्या विविध निधीसाठी विद्यार्थ्यांस वर्गणी द्यावी लागेल. यामध्ये शिक्षण निधी, कॉलेज विकास निधी, सैनिक कल्याण निधी, युनो दिन निधी, एन.एस.एस.निधी, ध्वजनिधी इ.समावेश होतो.

*** शिष्यवृत्त्या फी सवलत :**

महाविद्यालयात सर्व उपलब्ध शासकीय शिष्यवृत्त्या व फी सवलती प्राप्त होऊ शकतात. प्रत्येक शिष्यवृत्ती - फी सवलतीसाठी नियम सुचनाफलकावर लावले जातात. त्यासाठी सुचना फलकावर निर्धारित केलेल्या दिनांकापर्यंत अर्ज करावा लागतो. कागदपत्रांची पुर्तता करावी लागते. केवळ अर्ज केल्यावर शिष्यवृत्ती मिळेल असे नाहीतर शासकीय छाननीत शिष्यवृत्ती, फी सवलत मंजूर होते. विद्यार्थ्यांची अभ्यासातील प्रगती कमी झाल्यास, तो तासांना गैरहजर राहत असल्यास, गैरशिस्तीचे वर्तन दिसून आल्यास त्याला मंजूर झालेली शिष्यवृत्ती अगर फी सवलत रद्द करण्यात येईल. याबाबत प्राचार्यांचा निर्णय अंतीम राहील. तसेच शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती घेण्यासाठी बँकेचे खाते उघडणे गरजेचे आहे.

*** महाविद्यालयातील - शिस्त व नियत :**

विद्यार्थ्यांकडून शिस्त पालन आणि सद्वर्तन

**अ) सद्वर्तन :**

१) स्वतःचे वर्तन चांगले ठेवेल २) आचरण चांगले ठेवेल ३) महाविद्यालयाच्या आवारात तसेच महाविद्यालयाबाहेर एस.टी.बसमध्ये, सार्वजनिक ठिकाणी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या शैक्षणिक सहलीच्या ठिकाणी, मैदानावर शिस्तीचे काटेकोर पालन करेल.४) जाणते-अजाणतेपणाने महाविद्यालयाची अपकिर्ती होईल असे वर्तन घडणार नाही याची दक्षता घेईल.५) महाविद्यालयाची कोणत्याही बाबसंबंधी कोणतीही बातमी अथवा निवेदन वर्तमानपत्राकडे अथवा बाहेरील संस्थेकडे/एजन्सीकडे महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फतच देता येईल.

**ब) नियम** : कॉलेज नियम क्रमांक (१) मधील तरतुदींच्या विरूद्ध असणारी विद्यार्थ्यांची कोणतीही कृती ही गैरवर्तणुक आणि/किंवा बेशिस्त म्हणून समजली जाईल व ह्यामध्ये खालील परिच्छेदात वर्णन केलेल्या व्यक्तिशः अथवा सामूहिकरित्या केलेल्या कृतींच्या समावेश असेल.

१) महाविद्यालयाचे कामकाज कायद्याला धरूण चालण्यात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष अडथळा निर्माण करणारी किंवा अडथळा निर्माण होण्याच्या दृष्टीने कारणीभूत ठरणारी कोणतीही कृती
२) तास, प्रात्यक्षिके, ट्युटोरिअल्स आणि अन्य कोर्सेसना गैरहजर राहण्याची सवय
३) तास ट्युटोरिअल्स, प्रात्यक्षिके आणि अन्य कोर्सेस यांना नियमितपणे अनुपस्थित राहणे.
४) प्राचार्यांच्या पुर्वपरवानगी शिवाय देणगी प्राप्त करण्यासाठी प्रचार करणे किंवा

त्या प्राप्त करणे किंवा एखादी वस्तु अथवा निधी गोळा करण्याच्या उपक्रमात सहभागी हो

५) वस्तुस्थिती अथवा सत्य माहिती लपवून पदवी, पदव्युतर अथवा अन्य अभ्यासक्रमास प्रवेश घेणे.

६) महाविद्यालयाच्या आवारात वर्गातील उपक्रमातील एखाद्या विद्यार्थ्याला अ सामाजिक किंवा सांस्कृतिक, प्रयोगशाळेतील, मैदानावरील, जिमखान्यातील अ विद्यार्थ्यांच्या गटाला अडथळा निर्माण करणे.

७) महाविद्यालयाच्या आवारात स्फ ोटक शस्त्रे, प्राणघातक शस्त्रे, स्फ ोटके कि धोकादायक पदार्थ जवळ बाळगणे अथवा त्याचा वापर करणे.

८) महाविद्यालयात कोणतेही विषारी, मादक द्रव्य अथवा मद्य कोणत्याही स्वरूपात बाळ अथवा सेवन करणे.

९) महाविद्यालयात अथवा महाविद्यालयाच्या बाहेर तंबाखू किंवा तत्सम पदार्थ खाऊन पिच मारून भोवतालचा परिसर अस्वच्छ करणे. एखाद्या विद्यार्थ्याला छळणे किंवा रॅगिंग करणे.

१०) कोणत्याही विद्यार्थ्याला, महाविद्यालयाच्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्याला कु सदस्यला त्रास होईल.अथवा अडचण निर्माण करणारी गोष्ट करणे. ११) महाविद्यालयात अ महाविद्यालयाच्या बाहेर हिंसाचार, हल्ला, दहशतवादी कृत्ये करणे अथवा धमकी देणे.

१२) महाविद्यालयाचे रेकॉर्ड नाहीसे करणे त्यात फेरबदल करणे.

१३) महाविद्यालयात आयोजित केलेल्या कोणत्याही सभेस, सांस्कृतिक कार्यक्रमात, स कार्यक्रमात अथवा अन्य सार्वजनिक ठिकाणी विद्यार्थ्यास न शोभणारे वर्तन करणे.

१४) महाविद्यालय अथवा महाविद्यालयाचे कर्मचारी अथवा विद्यार्थी यांच्या मालमत नुकसान करणे अथवा त्याची चोरी करणे.

१५) महाविद्यालयात हिंसाचारास चिथावणी देणे किंवा हिंसाचारी कृत्यात अथवा प्रक्षो चळवळीत अथवा हिंसक संपात सहभागी होणे.

१६) महाविद्यालयाच्या एखाद्या कर्मचाऱ्यास अथवा अधिकाऱ्यास घेराव घालण्यात चिथा देणे अथवा घेराव्यात सहभागी होणे.महाविद्यालयाच्या परिसरातील इमारतींच्या भिंत किंवा अन्य ठिकाणी अक्षेपोर्ह लेखन व चित्रे काढणे.

१७) महाविद्यालयाचे अथवा संबंधित अधिकाऱ्याचे नियमांचे आणि कायद्यांचे उल्लंघन करणे.

१८) महाविद्यालयात कोणत्याही स्वरूपात जुगार खेळणे.

१९) स्वतः विरूद्ध ठेवण्यात आलेल्या आरोपांच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्याचे नेमले चौकशी अधिकाऱ्यापुढे साक्ष देण्यास नकार देणे.

२०) कोणत्याही स्वरूपात गोंधळ निर्माण करणारे वर्तन करणे अथवा अधिकाऱ्याने स करून मना केलेले वर्तन करणे.

२१) न्यायालयात गुन्हा केल्यामुळे दोषी म्हणून सिद्ध झालेला आणि नैतिक अध:पतनाचा समावेश असलेला.

२२) आतापर्यंत विशेष उल्लेख नसलेले कृत्य परंतु त्या विशिष्ठ परिस्थितीत अधिकाऱ्याला वाटलेली गैरकृत्य अथवा बेशिस्त.

**क) शिस्त :** विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे ओळखपत्र नियमित बाळगले पाहिले.जेव्हा जेव्हा संबंधीत अधिकाऱ्याकडून मागणी केली जाईल तेव्हा ते सादर केले पाहिजे.विद्यार्थ्यांनी विद्यापीठच्या नियमाप्रमाणे प्रत्येक सत्रातील तासांना व प्रात्यक्षिकांना (७५%) किमान उपस्थिती असलीच पाहिजे.महाविद्यालयाने आणि विद्यापीठाने नेमून दिलेला अभ्यासक्रम, ट्युटोरिअल्स, गृहपाठ, चाचण्या व प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांनी संबंधित विषय शिक्षक व प्राचार्यंचे समाधान होईल अशा पद्धती पुर्ण केले पाहिजे.

ज्या विद्यार्थ्यांची वर्षातील उपस्थिती तसेच प्रात्यक्षिके चाचण्या यातील उपस्थिती समाधानकारक नसेल अथवा जे विद्यार्थी विविध खेळ किंवा रा.से.यो.कार्यक्रम यात समाधानकारक उपस्थित राहु शकले नाहीत.तर त्यांना विद्यापीठाच्या परिक्षेस बसू दिले जाणार नाही. महाविद्यालयात प्रवेश घेतांना व कोणत्याही परिक्षेचा फार्म भरतांना संबंधित विद्यार्थी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

महाविद्यालयाच्या अधिकाऱ्यांनी वेळोवेळी आखून दिलेले शिस्तीने नियम पाळावेत सर्वच बाबतीत प्राचार्यांचा निर्णय हा अंतिम असेल व सर्व विद्यार्थ्यांवर तो बंधनकारक असेल. जे विद्यार्थी सायकली, स्वयंचलित दुचाकी वाहने इ.महाविद्यालयात आणत असतील तर महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या पार्कींग शेडमध्येच वाहन लावली पाहिजेत, अन्य कोणत्याही जागी विद्यार्थ्यांना वाहने लावण्यास सक्त मनाई असेल.

*** परीक्षेतील गैरप्रकाराबाबत शिक्षा :**

कोणत्याही परीक्षेत कॉपी करणे, पुस्तकाचे अथवा वहीचे पान/पाने जवळ बाळगणे, प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या अवैध मार्गाचा अवलंब करणे, उत्तरपत्रिका पुरवणी व अन्य साहित्याचे दोन-घेवाण करणे, परिक्षार्थी ऐवजी अन्य व्यक्तिने परीक्षा देणे इत्यादी सर्व कृत्य दाखलपत्र गुन्हा ठरवण्यात आले आहेत. या गुन्ह्यासाठी महाराष्ट्र शासन कायदा क्रमांक ३१/१९८२ कलम ७ अन्वये रू.५००/- पर्यंत दंड अथवा सहा महिने सक्त मुजरीच्या शिक्षेची तरतुद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या गुन्ह्यासाठी आणि उद्धटपणाने वर्तन केल्यास संबंधित विद्यार्थ्यांना डिबार करण्याचा व अन्य शिक्षा देण्याचा अधिकार केंद्र संचालक व विद्यापीठ अधिकारी यांना आहे. यांची परीक्षार्थीने नोंद घ्यावी.

## * महत्वाचे (सर्व विद्यार्थ्यांसाठी) :

१) महाविद्यालयात प्रवेश घेते वेळी सादर करावयाच्या (गुणपत्रक/दाखला) आवश्यक तेवढ्या झेरॉक्स प्रति काढून घ्याव्यात. कागदपत्र सादर केल्यानंतर कोणत्याही सबबीवर मुळ कागदपत्रे परत मिळणार नाहीत.

२) महाविद्यालयात एकदा प्रवेश घेतल्यानंतर केव्हाही महाविद्यालयात सोडले तरी संपूर्ण टर्मची फी भरावी लागते.

३) एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाही.

४) भारत सरकार शिष्यवृत्ती/महाराष्ट्र शासन शिष्यवृत्तीसाठी कागदपत्रे सादर करणे.

५) वार्षिक स्नेहसंमेलन होणार नाही त्या ऐवजी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जातील.

६) माहितीच्या अधिकारनुसार महाविद्यालयाच्या संबंधीत अधिकाऱ्याकडून माहिती मिळेल. विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिन (१५ ऑगस्ट) प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी) दिवशी होणाऱ्या ध्वजवंदनाला व कार्यक्रमांना उपस्थित रहाणे आवश्यक आहे. गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची नांवे शासनास कळविण्यात येतील.

## * मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सूचना :

१) स्कॉलरशिप अर्ज करतांना वडीलांचा उत्पन्नाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.वडील ह्यात नसतील तर मृत्युपत्र जोडणे आवश्यक आहे.व आईच्या नावाने उत्पन्न दाखला देणे.
२) एफ वाय/एस.वाय/टी.वाय.बी.ए. वर्गासाठी ८०% हजेरी आवश्यक आहे.
३) स्कॉलरशिप फ ार्म सोबत मार्कशिट झेरॉक्स कॉपी, जातीचा दाखला (झेरॉक्स) उत्पन्नाचा दाखला. ४) बँक पासबुकचे झेरॉक्स. ५) आधारकार्ड इ.कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

## * विशेष सुचना :

मुळ कागदपत्रे कार्यालयात प्रवेश घेतेवेळी जमा करतांना त्यांच्या जादा झेरॉक्स प्रती काढून ठेवाव्यात त्याची कोणतीही प्रत विशिष्ट मुदती पर्यंत परत मिळणार नाही.याची नोंद घ्यावी.

**प्राचार्य**
एस.जे.एम.एस.एम.चे कला,वाणिज्य वरिष्ठ व
कला, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, खापर
ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार (महा.)

## वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेशा बाबत लागणारे कागद पत्रांची यादी

### अ) F.Y.B.A. प्रथम वर्ष कला

१) १० वी चे गुणपत्रक झेरॉक्स
२) १२ वी चे मुळ गुणपत्रक व झेरॉक्स
३) १२ वी शाळा सोडल्याचा दाखला (L.C.) मुळ व झेरॉक्स
४) जातीचा दाखला
५) उत्पन्नाचा दाखला
६) बँक पासबुक झेरॉक्स
७) आधार कार्ड झेरॉक्स
८) वय/अधिवास दाखला
९) बँक खाते आधार लिंक पावती झेरॉक्स
१०) रक्त गट तपासणी
११) ई-मेल आयडी

### ब) S.Y.B.A. द्वितीय वर्ष कला

१) १२ वी वी चे गुणपत्रक झेरॉक्स
२) F.Y.J.C. मुळ गुणपत्रक
३) १२ वी शाळा सोडल्याचा दाखला (L.C.) झेरॉक्स
४) जातीचा दाखला
५) उत्पन्नाचा दाखला
६) बँक पासबुक झेरॉक्स
७) आधार कार्ड झेरॉक्स
८) वय/अधिवास दाखला
९) बँक खाते आधार लिंक पावती झेरॉक्स
१०) ई-मेल आयडी

## क) T.Y.B.A. तृतीय वर्ष कला

१) F.Y.J.C. गुणपत्रक झेरॉक्स
२) S.Y.J.C. गुणपत्रक झेरॉक्स
३) १२ वी शाळा सोडल्याचा दाखला (L.C.) झेरॉक्स
४) जातीचा दाखला
५) उत्पन्नाचा दाखला
६) बँक पासबुक झेरॉक्स
७) आधार कार्ड झेरॉक्स
८) वय/अधिवास दाखला
९) बँक खाते आधार लिंक पावती झेरॉक्स
१०) ई-मेल आयडी

**टिप : F.Y. / S.Y. / T.Y.B.A. च्या सर्व प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रत्येक कागदपत्रांची तीन झेरॉक्स कॉपी आवश्यक आहे.**

## * महाविद्यालयाची वैशिष्टे :-

१) मंडळाची स्थापना १५ जून १९९०

२) महाविद्यालय शासन मान्यता १९९६

३) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव संलग्न

४) विद्याशाखा कला

५) सुसज्य ग्रंथालय

६) सुसज्य जिमखाना

७) विषय - मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, सरंक्षणशास्त्र (जनरल)

८) मराठी, हिंदी, इतिहास, भूगोल (विशेषस्तरावर)

९) इंटरनेट सुविधा, सुसज्य प्रयोगशाळा (भूगोल)

१०) अनुभवी, तज्ञ, उच्च विद्याविभूषित अध्यापक वर्ग

११) महाविद्यालयाचा तर्फे आर्थिक मदत
गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी - कमवा शिका योजना

१२) विविध सांस्कृतिक, वैचारिक, सामाजिक, मंडळाद्वारा विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व व्यक्तिमत्व विकासास चालना. आणि संस्कार क्षम, नैतिक मुल्य शिक्षणावर भर

१३) सामन्य ज्ञान आणि पर्यावरण विषयी मार्गदर्शन.

१४) मैदानी आणि सामुहिक क्रिडा प्रकारांना प्राधान्य.

१५) राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) विभाग

१६) विद्यार्थी कल्याण विभाग

१७) कमवा व शिकवा योजना

१८) आर्थिक व दुर्बल घटक (ओपन) खुले वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थीनीनसाठी आर्थिक मदत (प्रवेश फ्री)

१९) महाविद्यालयातील प्रथम प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थीनीनसाठी होकेशनल कोर्सेससाठी मोफत प्रवेश

१) ब्युटीशियन कोर्सेस, थेरपी, ब्युटी, २) मेहंदी कोर्स, ३) संगणक बेसिक कोर्स, ४) M.S.Office कोर्स, ५) शिवण, कत्रण व गारमेंट

बुक-पोस्ट

प्रति,

श्री. ______________________

______________________

______________________

**From-**
**प्राचार्य**
एस. जे. एम. एस. एम. चे
कला, वाणिज्य वरिष्ठ व कला, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय
खापर ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार (महा.)

मातोश्री ऑफसेट, खापर

# Art's & Commerce Senior College,KHAPAR



Whether - SC, ST, NT, OBC, SBC, PTC, Paying

## APPLICATION FOR ADMISSION

494

Class ______________

Roll No. ______________

No. ______________

PHOTO

To,
The Principal
ART'S & COMMERCE SENIOR COLLEGE
KHAPAR, (Dist.-Nandurbar)

Sir,

As the desire of my guardian, I beg to apply for admission to the ______________ Class of your college. I am ready to pay priscribed fees in prospectus.

## ACADEMIC & PERSONAL INFORMATION :-

1) Full Name in BLOCK letters, begining with surname ______________

2) E-mail ______________ Mob.No. ______________

3) Also in Deonagari Script (in Marathi) ______________

4) Birth Date (According to the School Register) ______________

5) Birth Place with District ______________

6) Religion & Caste ______________ 7) Married/Unmarried ______________

8) Male / Female ______________ 9) Games Played in my College / School ______________

10) Other activities (Hobbies) ______________

11) Address ______________

12) College / School last attended with year and class ______________

13) Permanent Reg.No. if any ______________

14) Aadhar Card No. : ______________

**15) Examination Passed Information :-**

| Name of Exam. | Name of Board/Univ. | Exam. Seat No. | School/College from which Exam Passed | Year/Month of Passing | Total Marks Obtained | Class Obtained |
|---|---|---|---|---|---|---|
| $12^{th}$ Arts Commerce Science | | | | | | |
| F.Y.B.A. Arts Commerce | | | | | | |
| S.Y.B.A. Arts Commerce | | | | | | |
| T.Y.B.A. Arts Commerce | | | | | | |

* फी सवलतीने फॉर्म ऑफिसात देतांना सोबत प्रवेश घेतल्याची पावती आणावी त्याशिवाय असे फॉर्म स्विकारले जाणार नाहीत.

* सर्व रकाने भरणे आवश्यक आहे त्याशिवाय फॉर्म स्विकारला जाणार नाही.

1) ______________ ______________ ______________

2) ______________ ______________ ______________

3) ______________ ______________ ______________

4) ______________ ______________ ______________

5) ______________ ______________ ______________

6) ______________ ______________ ______________

16) Hereby submit to the disciplinary Jurisdiction of the principal and the authority of the college and shall read prospectus observe and abide by the rules made by the principal in that behalf of the college also declare that I shall not participate in any anti Goverment activities.

" I hereby agree that I shall attend the college regularly and shall appear for the terminal, Preliminary and test examination of the college If I fail to appear in the examination of do not show satisfactory progress, the principal will have the right to recall my examination form ".

I beg. so remain,

Place ______________

Date ______________

Your obedinetly
Signature of the Applicant

Name of the parent's / Guardian ______________

Relation with guardian ______________ Occupation of guardian ______________

Guardian's annual income from all sources Rs.

Guardian's Adddress

At. ______________ Post ______________ Taluka ______________ District ______________

**Guardian's consent :-** 1) I am giving permission for my ward to join your college and I shall read prospectus and see that the observed all rule discipline of the college and that he accepts and abide by the decision of the principle all matters pertaining to the college hostels.

I hereby declare that my ward attend to Mid/Terminal, Terminal Preliminary and test Examination of the College if he / she fail to attend the examinations or Show insatisfactory progress principal will have the right to recall of rejects his examinations or from and if he / she is found in practicing unfairmeans, copy case at the examination (university / college) the principal have right to rusticate / debar him / her from college.

Place ______________

Date ______________

Signature of Guardian

**(to be filled in by college officer)**

Class ______________ Roll No. ______________ Division ______________

Admission Commitee ______________

Admission Clerk

**ADMIT**

**PRINCIPLE**